IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# नितीन थोरात यांच्या कादंबऱ्यांमधील स्त्री-संघर्ष

**डॉ. अमोल सुभाष कवडे**
किसन वीर महाविद्यालय, वाई.

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*२१ व्या शतक*
*स्त्री-संघर्ष*

**ABSTRACT**

एकविसावे शतक हे स्त्री जागृतीचे, स्व- अस्मितेच्या शोधाचे आणि सामाजिक –सांस्कृतिक बंधनांना आव्हान देणाऱ्या स्त्री – संघर्षाचे युग म्हणून ओळखले जाते. समाजातील स्त्रीची भूमिका परंपरेने निश्चित केलेली असली, तरी आधुनिकतेच्या वादळात या भूमिकांचे पुनर्मुल्यांकन व्हायला सुरुवात झाली आहे. शिक्षण, रोजगार, राजकीय सहभाग, कायदेशीर हक्क आणि वैयक्तिक निर्णयक्षमता यांमुळे स्त्री अधिक सजग, स्वयंपूर्ण आणि स्वतःच्या जीवनाविषयी निर्णय घेण्यास धाडशी होत आहे. पण याच प्रक्रियेत तिला सामाजिक विघटन, पितृसत्ताक मर्यादा, भावनिक शोषण, लैंगिक असमानता, कुटुंबातील सत्ता-संबंध आणि आर्थिक दडपशाही असे अनेक संघर्षही अनुभवावे लागत आहेत. मराठी कादंबरी या बदलत्या वास्तवाचे प्रभावी माध्यम आहे. याच संदर्भात नितीन थोरात यांच्या कादंबऱ्या स्त्री संघर्षाचा अत्यंत वास्तव, संवेदनशील आणि टोकदार अविष्कार म्हणून समोर येतात.

थोरातांच्या कादंबरीमधील स्त्री ही केवळ पिडीत नसून प्रतिकार करणारी, स्वतःची मर्यादा ओलांडण्याचा प्रयत्न करणारी आणि जगण्याला नवा अर्थ देणारी खऱ्या अर्थाने जिवंत व्यक्ती आहे. प्रस्तुत शोधनिबंधात आपण नितीन थोरात यांच्या 'सूर्याची सावली' आणि'कोप' या कादंबऱ्यामधील स्त्री-संघर्षाचा थोडक्यात शोध घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 6%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Kawade, A. S. (2025). *नितीन थोरात यांच्या कादंबऱ्यांमधील स्त्री-संघर्ष*. IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), **1227–1231.**

**प्रस्तावना :**

एकविसावे शतक हे स्त्री जागृतीचे, स्व- अस्मितेच्या शोधाचे आणि सामाजिक –सांस्कृतिक बंधनांना आव्हान देणाऱ्या स्त्री – संघर्षाचे युग म्हणून ओळखले जाते. समाजातील स्त्रीची भूमिका परंपरेने निश्चित केलेली असली, तरी आधुनिकतेच्या वादळात या भूमिकांचे पुनर्मुल्यांकन व्हायला सुरुवात झाली आहे. शिक्षण, रोजगार, राजकीय सहभाग, कायदेशीर हक्क आणि वैयक्तिक निर्णयक्षमता यांमुळे स्त्री अधिक सजग, स्वयंपूर्ण आणि स्वतःच्या जीवनाविषयी निर्णय घेण्यास धाडशी होत आहे. पण याच प्रक्रियेत तिला सामाजिक विघटन, पितृसत्ताक मर्यादा, भावनिक शोषण, लैगिक असमानता, कुटुंबातील सत्ता-संबंध आणि आर्थिक दडपशाही असे अनेक संघर्षही अनुभवावे लागत आहेत. मराठी कादंबरी या बदलत्या वास्तवाचे प्रभावी माध्यम आहे. याच संदर्भात नितीन थोरात यांच्या कादंबऱ्या स्त्री संघर्षाचा अत्यंत वास्तव, संवेदनशील आणि टोकदार अविष्कार म्हणून समोर येतात.

थोरातांच्या कादंबरीमधील स्त्री ही केवळ पिडीत नसून प्रतिकार करणारी, स्वतःची मर्यादा ओलांडण्याचा प्रयत्न करणारी आणि जगण्याला नवा अर्थ देणारी खऱ्या अर्थाने जिवंत व्यक्ती आहे. प्रस्तुत शोधनिबंधात आपण नितीन थोरात यांच्या 'सूर्याची सावली' आणि'कोप' या कादंबऱ्यामधील स्त्री-संघर्षाचा थोडक्यात शोध घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

**'सूर्याची सावली' या कादंबरीमधील स्त्री संघर्ष :**

प्रस्तुत कादंबरी जानेवारी, २०२१ मध्ये प्रकाशित झाली असून, तिला राज्य शासनातर्फे दिला जाणारा श्री. ना. पेंडसे पुरस्कार मिळाला आहे. कादंबरीच्या केंद्रस्थानी 'बाप' ही प्रमुख व्यक्तिरेखा आहे. 'बाप' म्हणून आपले कर्तव्य बजावत असताना त्याला करावा लागणारा संघर्ष किंवा बाप आपल्या मुलासाठी काय करू शकतो याचे अत्यंत भावस्पर्शी चित्रण नितीन थोरात यांनी 'साजबा' या पात्राच्या माध्यमातून केले आहे. परंतु ज्यावेळी 'बाप' म्हणून जी भूमिका पार पाडली जाते, त्यावेळी बापाच्या पाठीमागे खंबीरपणे उभी असणारी 'आई' मात्र बऱ्याचवेळा दुर्लक्षित होताना दिसते. आपल्या मुलाच्या उज्वल भविष्यासाठी साजबाच्या बरोबरीने दुःख झेलणारी त्याची पत्नी 'दिनी' आणि तिने केलेला संघर्ष हादेखील तितकाच महत्वपूर्ण आहे, असे म्हणता येईल.

सावकाराच्या कर्जामुळे उध्वस्थ झालेले साजबाचे कुटुंब, पत्नी आणि दोन लहान मुलासह त्याच्या मोठ्या भावाने केलेली आत्महत्या, थोड्यात दिवसांत खचलेल्या आई-वडिलांचा मृत्यू आणि कर्ज न फेडता आल्याने सावकाराने ताब्यात घेतलेली जमीन, अशा कठीण प्रसंगात साजबाच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिलेली त्याची पत्नी'दिनी' आणि तिने केलेला संघर्ष हा कदाचित साजबाच्या संघर्षापुढे वाचकांच्या नजरेतून सुटू शकतो, परंतु आपल्या नवऱ्याचे दुःख, त्याने आपल्या मुलाला सुभण्याला डॉक्टर बनविण्याचे पाहिलेले स्वप्न यामध्ये दिनी पूर्णपणे स्वतःला झोकून देते. आणि साजबाच्या खांद्याला खांदा लावून संसार करताना दिसते.

कॉलेज जीवनात अंधश्रद्धेला विरोध करणारा साजबा आपल्या मुलाला डॉक्टर बनविण्यासाठी जेंव्हा देवऋषी बनतो आणि पैसे मिळवायला लागतो, तेंव्हा इतक्या पैशाचे काय करायचे ? हा प्रश्न दिनीला पडतो, तेंव्हा ती साजबाला सांगते की, "एक काम करायचं का धनी? आपण फकस्त पाच रुपये घायचं का ? म्हणजी दहा लोकं झाली तरी, आपल्याला पन्नास रुपये मिल्त्यान आणि त्याच्यावर पैसं झालंच तर सुभन्याच्या नावानं पोस्टात टाकू. काय व्हईन ते त्याला पुढं शिक्षणाला उपेगी पडेल. म्हंजी आपण लय पैशे घेतोय असं लोकांनाबी वाटायचं नाय आन आपल्यालाबी पैशाची हाव सुटणार न्हाय."[१] या ठिकाणी दिनीची सावध भूमिका तर दिसतेच, शिवाय आपला नवरा करत असलेला धंदा जास्त दिवस चालणार नाही याची तिला खात्री वाटत असल्याने ती दूरदृष्टीने भविष्याचादेखील विचार करताना दिसते.

साजबा जरी अंधश्रद्धेच्या नावाखाली लोकांवर उपचार करत असला, तरी दिनी मात्र आपल्या मुलाला स्वतः दवाखान्यात घेऊन जाते आणि डॉक्टरने सांगितलेला कोर्स पूर्ण करते. आपल्या मुलाचे डॉक्टर होण्याचे स्वप्न

पाहणारा साजबा जरी आपल्याला दिसत असला, तरी मुलाच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या दिनिकडे दुर्लक्ष करता येणार नाही. इतर मुलींप्रमाणे दिनीनेदेखील लग्न झाल्यानंतर सुखीसंसाराचे स्वप्न पहिले असेल, परंतु थोड्याच दिवसात जमीन, घर सर्वकाही गमावल्यानंतर गाव सोडून परांगदा झालेली दिनी आपल्या नवऱ्याला एकटे न सोडता, आहे त्या परिस्थितीत आपल्या नवऱ्याला साथ देते; कधी उपाशी तर कधी शिळ्या भाकरीचे तुकडे पाण्यात भिजवून खाते. कित्येक दिवस एकाच साडीवर विना आंघोळीचे राहते. एक दिवस अवघड डोंगर उतरत असताना, तुला जमेल का उतरायला ? असे साजबाने विचारल्यावर दिनी म्हणते की, " आवं धनी वाघीणीचं काळीज हाये हितं. तुमच्याबरं कुठबी जायची तयारी हाये बघा माझी."[२]वास्तव परिस्थिती स्विकारून हिम्मत न हरता आपल्या नवऱ्याला आधार देणारी स्त्री दिनीच्या माध्यमातून नितीन थोरात यांनी साकारली आहे. बाप देवऋषी असल्याचा परिणाम मुलाच्या शिक्षणावर होऊ नये, आणि त्याच्यावर चांगले संस्कार व्हावे म्हणून सुबन्याला शिक्षणासाठी दूर होस्टेलला ठेवण्याचा निर्णय घेतला जातो, तेव्हा साजबाला वेळ नसल्याने दिनी स्वतः किलकरवाडीला जाऊन चांगल्या शाळांचा शोध घेते. साजबाला ज्याप्रमाणे आपल्या मुलाच्या शिक्षणाची काळजी आहे, तशी आई म्हणून दिनीलादेखील आहे.त्यासाठी ती स्वतः त्याच्यावर बारीक लक्ष ठेवून असते. एक दिवस मुलाने शाळेत दगड मारून कोणाचे तरी डोकं फोडल्याचे कळताच ती त्याच्या मुस्कटात मारायला देखील मागे पुढे पाहत नाही. यावरून दिनी आपल्या मुलाच्या बाबतीत किती संवेदनशील होती, हे दिसून येते.

सर्व काही ठीक चालले असताना अचानक एक दिवस सुबण्या दिनीला म्हणतो की, मला शाळा शिकायची नाही. तेंव्हा ती सुभण्यावर चिडते आणि म्हणते, "मग काय करणार ? बापासारखा दिवरुशी बनणार ? क्यास मोकळं सोडून लोकांपुढ नाचणार ?"[३] यावरून आजवर ज्याच्यासाठी आपण एवढा संघर्ष केला तो आता वाया जाणार की काय ? ही शंका तिच्या मनात निर्माण झाली होती. शेवटी ती शंका खरी ठरली, एक दिवस खरोखरच सुबण्या दिवऋषी झाल्याचे दिनीला दिसले. सजाबाच्या भक्तीने आणि देवीच्या आशीर्वादाने आपल्याला नवीन वारस मिळाला या आनंदात लोक सुबण्याचा जयजयकार करू लागल्याचे आणि त्याला खांद्यावर घेऊन नाचू लागल्याचे दृश्य पाहून ती जाग्यावर प्राण सोडते.

प्रस्तुत कादंबरीमध्ये बाप म्हणून साजबाचा संघर्ष नक्कीच मोठा आहे, परंतु त्याच्यासोबत एक आई म्हणून आपल्या मुलासाठी शेवटच्या क्षणापर्यंत झटणारी, त्यानेडॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणारी दिनी आणि तिने केलेला संघर्ष हा अंतर्बाह्य स्वरूपाचा आहे, हे नाकारून चालणार नाही. स्वतःचा कोणताही दोष नसताना लग्न झाल्यानंतर थोड्याच दिवसात परांगदा होण्याची वेळ, तान्हया मुलाला कंबरेला घेऊन मैलोंमैल प्रवास करणे, उपाशीपोटी दिवस काढणे, नाईलाजाने नवऱ्याची अंधश्रद्धा स्वीकारणे, ज्याच्यासाठी हे सर्व केले त्या मुलाकडून मनाशी बाळगलेली सर्व स्वप्ने धुळीस मिळणे आणि शेवटी तो धक्का सहन न झाल्याने बसल्या जागी प्राण सोडणे, हाच तिच्या संघर्षाचा पूर्णविराम म्हणावा लागेल. प्रस्तुत कादंबरी जरी साजबाभोवती फिरत आहे असे वाटत असले, तरी कादंबरीला प्रवाही ठेवण्याचे काम थोरात यांनी दिनीच्या माध्यमातून केले आहे, हे नक्की.

**'कोप' या कादंबरीमधील स्त्री संघर्ष :**

प्रस्तुत कादंबरी मार्च,२०२३ मध्ये प्रकाशित झाली असून, ५ जानेवारी २००५ मध्ये मांढरदेवी दुर्घटनेत उध्वस्त झालेल्या कुटुंबाची ही कहाणी आहे. या कादंबरीमध्येदेखील श्रीकांतच्या रूपाने 'बाप' हाच विषय कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. असे असले तरीआईच्या रूपाने ज्योतीची कहाणीदेखील तितकीच मनाला चटका लावणारी आहे. चेंगराचेंगरीतपोटची पाच वर्षाची मुलगी आणि आई-वडील मरण पावलेल्या श्रीकांतची जी शोकांतिका आहे, तशीच ती पोटची मुलगी आणि सासू- सासरे गमावलेल्या ज्योतीचीदेखील आहे.

काळूबाईवर नितांत श्रद्धा असणारी ज्योती, त्या दुर्घटनेनंतर मात्र काळूबाईचा तिरस्कार करू लागते; घरातील देव्हारा फेकून देते आणि श्रीकांतला देखील काळूबाईची सेवा करण्यास विरोध करते, ज्या भक्तीभावाने तिच्या कुटुंबाने काळूबाईची मनोभावे सेवा केली, तिच्याच दारात तिची मुलगी आणि सासू-सासरे चेंगरून मृत

पावतात, त्यामुळे तिच्या रागाचा उद्रेक होणे स्वाभाविकच होते. प्रस्तुत कादंबरीतील जबर मानसिक धक्का बसलेला श्रीकांत मात्र एवढे होऊनही त्याची काळूबाईवरील श्रद्धा अजिबात कमी होत नाही, मानसिक आघात झाल्याने कंडक्टरअसणाऱ्या श्रीकांतच्या ठिकाणी ज्योती नोकरीला लागते आणि दुःखातून स्वतःला आणि श्रीकांतला सावरण्याचा आटोकाट प्रयत्न करते, जे दुखः श्रीकांतचे होते तेच तिचे होते, पण आता यातून बाहेर पडून पुन्हा नव्याने जीवनाची सुरवात केली पाहिजे, यासाठी ती श्रीकांतला काळूबाईपासून दूर नेण्याचा प्रयत्न करते पण त्यामध्ये तिला यश येत नाही, म्हणून शेवटी ती नाइलाजाने श्रीकांतला सोडण्याचा विचार करते. तिचे आईवडील तिला खूप समजावून सांगतात, त्यावेळी ती म्हणते की, “बाईलयेडा असता तर सांभाळून घेतला असता आई. हा देवभोळा माणूसहे. देवभोळा कसला, देवानं यडा झालेला माणूसहे तो. अग मी आजवर पन्नास वेळा सांगितलंय की, काळूबाईचा नाद सोडून द्या. तरींही त्यांना काळूबाई पाहिजे.” [४]

एकेकाळी हीच ज्योती श्रीकांतसोबत जेंव्हा काळूबाईच्या दर्शनाला जाते तेव्हा तिच्यासमोर हात जोडून आशीर्वाद मागत असते. “ आई काळूबाई, तू माझ्या पोटी येणार हे मी माझं भाग्य समजते. माझ्या नवऱ्याची तुझ्यावर सुमद्रासारखी भक्तीहे. त्या भक्तीला कधी ओहोटी येऊ नये हीच माझी इच्छा. आमचा संसार आयुष्यभर असाच हसतखेळत राहूदे, एवढाच आशीर्वाद दे आई.”[५] आज तीच ज्योती याच काळूबाईसाठी आपल्या नवऱ्याला सोडण्याचा निर्णय घेते. आणि तिच्या दृष्टीने ते बरोबर आहे. कारण आज जिच्यामुळे आपला संसार उध्वस्त झाला, तिला आपल्या घरात स्थान का द्यायचे ? अशा प्रकारची तिची भूमिका आहे. वाचकांना हा ज्योतीचा निर्णय कदाचित आवडत नसेल, परंतु झालेल्या घटनेचे दुखः बाजूला सारून तिला आपल्या नवऱ्यासोबत पुन्हा नव्याने संसार करायचा आहे, तिचे श्रीकांतवर अतोनात प्रेम आहे. एकेकाळी जी काळूबाई त्यांच्या प्रेमामधील समान धागा होते आज तीच काळूबाई त्यांच्यामध्ये दरी म्हणून उभी आहे. इतक्या मोठ्या कठीण प्रसंगी कुटुंबाला सावरण्याची जबाबदारी खऱ्या अर्थाने पुरुष म्हणून श्रीकांतची आहे, परंतु या ठिकाणी ही भूमिका मनापासून पार पडण्याचा प्रयत्न ज्योती करत असते.

कादंबरी वाचल्यानंतर ज्योती श्रीकांतसोबत चुकीची वागली, तिने त्याला सोडायला नको होते, तिने स्वतःचा विचार केला, ती स्वार्थी निघाली, असे विचार वाचकांच्या मनात येणे स्वाभाविक आहे. परंतु जेंव्हा चेंगराचेंगरी सुरु असते, सिलेंडरचे स्फोट होतात तेंव्हा ती आपल्या मृत लेकीला टेम्पोत टाकून देवळाच्या दिशेने पळत सुटते आणि म्हणते, “मी नवऱ्याला सोडू शकत नाय तात्या. काळूबाईच काय, पण तेहत्तीस कोटी देवबी मला माझ्या नवऱ्यापासून वेगळ करू शकत नाय.”[६] एवढे जीवापाड प्रेम असणारी ज्योती आपल्या नवऱ्याला सोडण्याचा निर्णय सहजासहजी घेणे शक्य नाही, यापाठीमागे तिचा खूप मोठा संघर्ष आहे, दुःखाचा डोंगर तिने पचवला आहे, आणि तो केवळ आपल्या नवऱ्यासाठी, परंतु त्याच्याकडून कसलाच प्रतिसाद मिळत नसेल, तर ती तरी काय करणार? ज्योती कालांतराने दुसरे लग्न करते, आपल्या पहिल्या मुलीचे श्रद्धा हे नाव दुसऱ्या मुलीलादेखील देते. योगायोगाने जेंव्हा श्रीकांत आणि ज्योती यांची भेट होते तेंव्हादेखील ज्योतीचे डोळे पाण्याने डबडबतात, यावरून आजही तिच्या हृदयात श्रीकांतचे स्थान अढळ आहे. यावरून ज्योतीचा संघर्ष हा दुहेरी स्वरूपाचा असल्याचे दिसते. प्रस्तुत कादंबरी ही सतत श्रीकांतच्या दुःखाभवती फिरत असली, तरी खरा संघर्ष मात्र ज्योतीचा आहे. नावाप्रमाणे अंधकारमय झालेल्या संसारात ती पुन्हा उजेड निर्माण करण्याचा प्रयत्न करते, परंतु त्यामध्ये ती यशस्वी होताना दिसत नाही.

**समारोप :**

प्रस्तुत दोन्ही कादंबऱ्यामधील स्त्री संघर्षाचा विचार करत असताना ‘दिनी’ आणि ‘ज्योती’ यांच्या संघर्षात अनेक प्रकारचे साम्य दिसून येते, एका बाजूला दिनी आपल्या मुलाच्या भविष्यासाठी संघर्ष करताना दिसते, तर दुसऱ्या वाजूला ‘कोप’ मधील ज्योती चेंगराचेंगरीमध्ये मरण पावलेल्या आपल्या लेकीला विसरत पुन्हा संसार उभा करण्याचा प्रयत्न करताना दिसते. अंधश्रद्धा वगैरे काही नसते हे माहीत असूनसुद्धा दिनी आपल्या मुलासाठी

नवऱ्याच्या देवऋषीपणाला स्वीकारते तर सुरुवातीला अंधश्रद्धेवर विश्वास असणारी ज्योती आपल्या मुलीच्या मृत्यूनंतर मात्र अंधश्रद्धेच्या विरोधात पेटून उठते. मुलाच्या रूपानेमनाशी बाळगलेले स्वप्न धुळीस मिळाल्याने दिनी प्राण सोडते, तर पोटची मुलगी डोळ्यासमोर मरूनसुद्धा काळजाचा दगड करून ज्योती पुन्हा उभी राहू पाहते. अशा प्रकारे नितीन थोरात यांच्या या दोन्ही कादंबऱ्या या पुरुषप्रधान वाटत असल्या तरी त्यामधून कमालीचा स्त्री-संघर्ष येताना दिसतो.

संदर्भ :

१) थोरात नितीन, सूर्याची सावली, रायटर पब्लिकेशन, पाचवी आवृत्ती २०२४, पृ. ८७
२) तत्रैव, ९७
३) तत्रैव, १३५
४) थोरात नितीन, कोप, रायटर पब्लिकेशन, तिसरी आवृत्ती २०२४, पृ. ७१
५) तत्रैव, ४५
६) तत्रैव, १२१